उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, अकलूज कार्यालयाकरिता ब्रेक टेस्ट ट्रॅक उभारण्यासाठी प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याबाबत..

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः एमव्हीडी-०२१८/प्र.क्र.४७/परि-४

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : २४ मे २०१८

वाचा :

१) प्रा.प.का. पुणे यांचे ज्ञापन क्रमांकः जा.क्र.१४०५८/आस्था/प्रापका/पुणे/२०१६, दि.२४.११.२०१६
२) महसूल व वन विभाग,शा.नि.क्र.जमीन ३७१७/१९६/प्र.क्र८/ज-५, दि.०४.१२.२०१७
३) परिवहन आयुक्त कार्यालयाचे क्र.ब्रेचाप(४५)/०२१८/न.क्र.३/का.१०(१)/जा.क्र.२८६४, दि. २० .०२.२०१८ चे पत्र.

प्रस्तावना :

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका क्र.२८/२०१३ (श्रीकांत कर्वे वि.महाराष्ट्र शासन) मध्ये दि.१८.०२.२०१६ रोजी दिलेल्या निर्णयानुसार उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, अकलूज येथे २५० मीटर लांबीचा ब्रेक टेस्ट ट्रॅक बांधण्यासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे यांच्या संदर्भाधीन क्र.१, दि.२४.११.२०१६ च्या ज्ञापनान्वये रु.१९,९५,३३७/- इतक्या खर्चास प्रथम प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यात आली होती. प्रस्तूत जागा ही नीरा उजवा कालवा विभाग यांच्या नावे होती. परंतु सदर जागा ही हस्तांतरीत न करता ११ महिन्यांकरिता भाडेपट्टा रक्कम रु १.१७ कोटी व त्यानंतर प्रत्येक वर्षी १०% वाढीव दराने भाडेतत्वावर देवू केली होती. त्यामुळे महसूल व वन विभागाकडे नव्याने जागा मागणी केली होती. महसूल व वन विभागाने संदर्भ क्र. २ वरील दि.०४.१२.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये मौजे मोटेघर, ता.माळशिरस, जि.सोलापूर येथील गट नं. ७८७ मधील ३ हेक्टर शासकीय गायरान जमीन विहीत अटी व शर्तींच्या अधीन भोगाधिकार मुल्य रहित व महसूल मुक्त किंमतीने उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, अकलूज या कार्यालयास हस्तांतरीत केली आहे. त्यामुळे प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे यांचे संदर्भ क्र. १ वरील दि. २४.११.२०१६ रोजीचे आदेश रद्द करुन महसुल व वन विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या जागेवर ब्रेक टेस्ट ट्रॅक उभारण्याच्या खर्चाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:

उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, अकलूज येथे ब्रेक टेस्ट ट्रॅक उभारण्यासाठीच्या रु.२,२१,०५,६४७/- (रुपये दोन कोटी एकविस लक्ष पाच हजार सहाशे सत्तेचाळीस फक्त) इतक्या

खर्चाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे. त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

Sr.No.	Particulars	Amount (In Rs.)
१	Sub Estimate No.१ (Main track with approach & service road)	१,२९,१२,४१६.००
२	Sub Estimate No.२ (Control room,Wire fencing Railing & Gate)	१५,१९,०८५.००
	Additional Royalty Charges	१९,५२,७२१.००
	Total	१,६३,८४,२२२.००
	११% for Electrification	१८,०२,२६४.००
	Total	१,८१,८६,४८६.००
	Add ४ % Contingencies Charges	७,२७,४५९.००
	Add ५% Centage Charges	९,०९,३२४.००
	Add १२ % GST	२१,८२,३७८.००
	Add Bore Well	१,००,०००.००
	Total	२,२१,०५,६४७.००

२. उपभोक्ता विभागाच्या वतीने उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, अकलूज यांनी साक्षांकन करावे.

३. यासाठी येणारा खर्च मागणी क्र.बी-३, २०४१ वाहनांवरील कर, (०१)(०६) वाहन चालविण्यासाठी चाचणी घेताना गुणात्मक वाढ करण्याकरिता पायाभूत सोयीमध्ये दर्जावाढ करणे, कृत्रिम चाचणी पथ बांधणे (कार्यक्रमांवरील) (२०४१ ०३२१) १३-कार्यालयीन खर्च या लेखाशीर्षाखाली सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरिता केलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.२६५/इमा-२, दि.२१.०५.२०१८ अन्वये दिलेल्या सहमतीने तसेच, वित्तीय अधिकार नियमपुस्तिका, १९७८ भाग-एक, उपविभाग-५, अ.क्र.१ व सा.बां.विभाग नियमपुस्तिकेतील परिच्छेद क्र.१३४ नुसार तसेच, वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.९/अर्थ-३, दि.०२.०४.२०१८ मधील परिच्छेद क्र.६ अ) नुसार असलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५२४१७५३१२५१२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kadam Dattatray Hanmant

Digitally signed by Kadam Dattatray Hanmant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7fee1bbc15b71aa23bf3ffa4e468df7492703428e9ad65c6cd79299927331e6f, cn=Kadam Dattatray Hanmant
Date: 2018.05.24 17:51:27 +05'30'

(द.ह. कदम)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव
३. मा.राज्यमंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव
४. महालेखापाल (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, १/२, मुंबई /नागपूर
५. परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
६. परिवहन उप आयुक्त (प्रशासन/संगणक/लेखा), परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई
७. प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे
८. उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, अकलूज
९. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१०.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
११.जिल्हा कोषागार अधिकारी, सोलापूर
१२.उप सचिव (इमा) सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
१३.अवर सचिव (बीयुडी-१), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
१४.निवडनस्ती (परि-४)